**मुख्य कार्यालय,**
**यशवंत नगर, विरार (प.)**
**ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०३**

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

**दुरध्वनी** : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
**फॅक्स** : ०२५० - २५२५१०७
**ई-मेल** : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र.**: व.वि.श.म./बांध/शाअ/०३६/२०२५
**दिनांक** : ११/११/२०२५

## आदेश

विषय :- जनहित याचिका क्र. ७१/२०१३ Interim Application (Lodgin)No.२९११९ of २०२५ अंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रस्त्यावरील खड्ड्यांच्या संदर्भात दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत यांनी समिती गठित करणे बाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रस्त्यावरील खड्ड्याच्या संदर्भात जनहित याचिका क्र. ७१/२०१३ अन्वये दिनांक १३/१०/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व महानगरपालिका/ नगर परिषद/ नगर पंचायती यांनी समिती गठित करणे आवश्यक आहे. सदर निर्देशाच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रशासकीय रचनेनुसार खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका | अध्यक्ष |
| २ | सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पालघर | सदस्य सचिव |
| ३ | अतिरिक्त आयुक्त (उत्तर),<br>वसई विरार शहर महानगरपालिका | सदस्य |
| ४ | अतिरिक्त आयुक्त (दक्षिण),<br>वसई विरार शहर महानगरपालिका | सदस्य |
| ५ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील संबंधीत प्रशासकीय विभागाचे वरिष्ठ पेलिस निरिक्षक | सदस्य |
| ६ | शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका | सदस्य |

वरील प्रमाणे समिती सदस्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्याकडील जनहित याचिका क्र. ७१/२०१३ मधील आदेश Interim Application (Lodgin) No.२९११९ of २०२५ (For Intervention) अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार व त्यामधील दिलेल्या सुचनेनुसार महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावरील खड्ड्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्ड्यामुळे व उघड्या मॅनहोल मुळे अपघात झाल्यास अपघातग्रस्त नागरीकांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समिती सदस्यांनी वेळोवेळी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. ७१/२०१३ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही पार पाडावी व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावरील खड्ड्यामुळे जिवीत हानी होणार नाही याकरीता आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.

डॉ.इंदु राणी जाखड़ (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

प्रत- माहितीस्तव -

१. मा.सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पालघर
२. अतिरिक्त आयुक्त (उ), वसई विरार शहर महानगरपालिका
३. अतिरिक्त आयुक्त (द), वसई विरार शहर महानगरपालिका
४. वसई विरार शहर महानगरपालिका, हद्दतील संबंधीत विभागाचे वरिष्ठ पेलिस निरीक्षक
५. शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner